E mail Id—sp.nanded@mahapolice.gov.in,pronanded@gma

**Press Note** दिनांक 25.07.2025

**गोदावरी नदी पात्रातील अवैध रेती उपसा करणाऱ्या रेती माफियावर नांदेड ग्रामीण पोलीसांनी छापा कारवाई करुन 21,75,000/- रुपयाचा मुद्देमाल केला जप्त**

| **पोलीस ठाणे** | **गु.र.नं. व कलम** | **फिर्यादीचे नाव व पत्ता** |
|---|---|---|
| नांदेड ग्रामीण | गुरन 707/2025 कलम 303(2), 3(5) भा. न्या.सं, सहकलम 48(7), 48(8) महराष्ट्र ज.महसूल संहिता 1966, सहकलम 9,15 पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986, सहकलम 3,7 सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम 1984 | प्रमोद गोविंदराव कऱ्हाळे, वय 54 वर्ष व्यवसाय नौकरी, पोहेकॉ/2434 नेम.पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण |
| **माहिती** | **गुन्हा घडला तारीख वेळ व ठिकाण** | **गुन्हा दाखल तारीख व वेळ** |
| गोपनीय माहीती | दिनांक 24.07.2025 रोजी वेळ 16.30 वाजता मौजे विष्णुपरी शिवारातील गोदावरी नदी पात्रात | दिनांक 25.07.2025 रोजी वेळ 01.49 |

**यांचे मार्गदर्शनाखाली**

मा.श्री अबिनाश कुमार,पोलीस अधीक्षक,नांदेड
मा.सुरज गुरव,अपर पोलीस अधीक्षक,नांदेड
श्रीमती अर्चना पाटील,अपर पोलीस अधीक्षक,भोकर
मा.सुशीलकुमार नायक,उप विभागीय पोलीस अधिकारी ,इतवारा

**गुन्हा उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी वअंमलदार**

पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक बाबुराव चव्हाण,चालक सपोउपनि/ शेटे, पोहेकॉ/2434 प्रमोद कऱ्हाळे, पोहेकॉ/2454 तेलंग,पोहेकॉ/2606 डफडे, पोकॉ/1500 सिरमलवार,पोकॉ/516 कदम,पोकॉ916 भिसे,पोकॉ/ पटेल,पोकॉ/531 कवठेकर,चापोकॉ/167 मेकलवाड, होम/ 137 इम्रान, होम/1766 शेख रियाज सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रामीण.

**आरोपीचे नाव**

१) पांडूरंग महादराव हंबर्डे,वय ५५ वर्ष,व्यवसाय मजुरी,रा. काळेश्वर नगर विष्णुपुरी नांदेड
२) अच्छेलाल पि.गुलाबचंद राम, वय ३२ वर्ष, व्यवसाय मजुरी, रा. लक्ष्मणपुरा जि बलिया राज्य उत्तर प्रदेश
३) इतर सहा- एकुण ०८ आरोपी

**जप्त मुद्देमाल/ एकुण मुद्देमाल**

1) अंदाजे 25 ब्रास रेती (वाळु) किंमत 1,25,000/- रुपये, 2) रेती उपसा करणारे 06 इंजिन किंमत 12,00,000/- रुपये, 3) 17 तराफे किमत 8,50,000/- रुपये असा एकुण 21,75,000/- रुपयाचा मुद्देमाल

**थोडक्यात हकीकत**

**मा. श्री.अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट** अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतुक करणारे लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे.

त्या अनुषंगाने ओमकांत चिंचोलकर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांना वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासह पो.स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, विष्णुपूरी शिवारातील गोदावरी नदीपात्रातुन काही रेती माफीया हे इंजिन व तराफ्याच्या सहाय्याने अवैधरित्या रेतीचा उपसा करुन रेतीची नदीकाठावर साठवणूक करीत आहेत. अशा खात्रीशीर मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दिनांक 24.07.2025 रोजी चे 16.30 वा सुमारास मौजे विष्णुपूरी शिवारातील गोदावरी नदीच्या किनारी नदीच्या पात्रात जावून छापा मारला असता पाच ते सहा आरोपी पोलीसांना पाहून नदीमध्ये उडी मारुन पलीकडच्या किनाऱ्यावर पोहून पळून गेले. दोन आरोपी नदीपात्रातुन पोहून पळुन जात असतांना वरील पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी नदीपात्रात उड्या मारुन पोहत जावुन अतिशय शिताफिने त्या दोघांना पकडुन नदी काठावर आणुन ताब्यात घेतले. सदर ठिकाणी नदीपात्रातुन अवैधरित्या उपसा करुन किणाऱ्यावर आणुन साठविलेली अंदाजे 25 ब्रास रेती किंमत 1,25,000/- रुपये, पाण्यातुन रेती उपसा करणारे 06 इंजिन किंमत अंदाजे 12,00,000/- रुपये, रेती उपसा करण्यासाठी वापरलेले एकुण 17 तराफे किमत 8,50,000/- रुपये असा एकुण 21,75,000/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला/काही मुद्देमाल आग लावुन जागीच नष्ट करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या नवीन परिपत्रकानुसार वेगवेगळ्या चार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे **मा. श्री.अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी** कौतुक केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड